E:\Ajit 20.12.79\DOCKET SHEET


# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर (म. रा.)

mpkv.ac.in | registrar.mpkv@nic.in | Registrar Office ☎ (०२४२६) २४३२१६ ℻ २४३८१६
arofm01@gmail.com | vipghmpkv@gmail.com | AR Ofm Office ☎ (०२४२६) २४३२२२
VIP Guest House ☎ (०२४२६) २४३३५८ ℻ २४३२१२


जा. क्र. काव्य/अ.गृ./२७२ /२०१७ दिनांक :-29 MAR 2017

## परिपत्रक

**विषय : शेतकरी निवास येथील कक्ष क्र.२४ कृषि विद्यापीठ व शासकीय वाहनचालकांकरीता आरक्षणाबाबत..**

**संदर्भ** : १. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. काव्य/ वि.श्रे.अ.कृ./२१०/२०१६, दिनांक०१/०७/२०१६
२. कृषि विद्यापीठ वाहनचालक संघटना यांचे पत्र जा.क्र.७ कृ. वि. वा. चा. सं./ ७/ ३०/ २०१७, दिनांक ३०/०१/२०१७

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि विद्यापीठ वाहनचालक संघटनेने दिलेल्या पत्रानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वाहनचालक कार्यालयीन कामानिमित्त मध्यवर्ती परिसर राहुरी येथे येत असतात. त्यांना विश्रांती करीता अतिथीगृहामध्ये स्वतंत्र निवासव्यवस्था उपलब्ध होणेबाबत विनंती करण्यात आली होती.

त्यानुषंगाने मा. कुलगुरु यांचे मान्यतेने संदर्भ क्र. १ च्या विद्यापीठ परिपत्रकान्वये यापुर्वी वाहनचालकांकरीता मुळा-गोदावरी अतिथीगृहामधील आरक्षीत करण्यात आलेले कक्ष क्र. ४१ रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी मध्यवर्ती परिसर, राहुरी येथील शेतकरी निवासामध्ये कक्ष क्र. २४ हा शासकीय वाहनचालकांकरीता खालील अटींच्या अधिन राहुन सशुल्क आरक्षीत करण्यात आलेले आहे. विद्यापीठ अधिनस्त सर्व वाहनचालकांना कळविण्यात येते की, सदर अतिथीगृहामध्ये स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली असुन सदर नोंदवहीत नोंद करुन अतिथीगृहाचे शुल्क **रुपये ५०/-** इतके प्रतिदिन प्रमाणे आकारण्यात येईल.

तसेच याबाबत आणखी असे ही आदेशीत करण्यात येते की, सदर अतिथीगृहामध्ये कुठलाही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, यांची वाहनचालकानी नोंद घ्यावी.

**अटी -**

१. अतिथीगृहामध्ये परिपत्रानुसार कक्ष आरक्षित करणे व उपलब्ध करुन देणे बाबत कार्यवाही करण्यात यावी. अनुज्ञेय व्यक्ती व्यतीरिक्त इतरास कक्ष हस्तांतरीत करणे/ उपलब्ध केल्यास संबधीत अतिथीगृहाच्या प्रभारी यांना जबाबदार धरुन पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
२. अनुज्ञेय वाहनचालक यांना ४ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी कक्ष उपलब्ध करता येणार नाही.
३. फोटो ओळखपत्र असल्याशिवाय अतिथीगृहामध्ये कक्ष उपलब्ध करण्यात येऊ नये. (उदा. विद्यापीठ/ शासकीय वाहनचालक असल्याचे ओळखपत्र दाखविणे बंधनकारक राहील.)

(गणेश घोरपडे)
कुलसचिव

**प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.**

१. संचालक, विस्तार शिक्षण/ संशोधन संचालक, मफुकृवि., राहुरी.
२. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, मफुकृवि., राहुरी
३. सर्व सहयोगी अधिष्ठाता/ सहयोगी संशोधन संचालक
४. नोडल ऑफिसर नंदुरबार/ कराड/ मुक्ताईनगर,
५. विभाग प्रमुख (सर्व) /विशेषज्ञ (सर्व),
६. नियंत्रक/ विद्यापीठ ग्रंथालय/ विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी,
७. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन केंद्र/ कृषि विज्ञान केंद्र/ प्रकल्प/ योजना (सर्व)
८. प्राचार्य, कृषि विद्यालये/ कृषि तंत्र विद्यालये (सर्व)
९. विद्यार्थी कल्याण अधिकारी/ कामगार कल्याण अधिकारी, मफुकृवि, राहूरी,
१०. सुरक्षा अधिकारी/ कर्मशाळा अधिक्षक, मफुकृवि, राहुरी,
११. उपकुलसचिव (प्रशासन/ विद्या), मफुकृवि,राहुरी
१२. सहाय्यक कुलसचिव/ सहाय्यक नियंत्रक/ लेखा व अधिदान अधिकारी (सर्व)
१४. मा. कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी,
१५. मा.कुलगुरु यांचे तांत्रिक अधिकारी, मफुकृवि, राहुरी.
१६. मध्यवर्ती परिसरातील सर्व अतिथीगृहाचे प्रभारी अधिकारी
१७. अध्यक्ष, कृषि विद्यापीठ वाहनचालक संघटना, मफुकृवि, राहुरी.
१८. श्री.एम.एन.सुरवसे, लिपीक (काव्य),मफुकृवि, राहुरी.

२/- त्यांना कळविण्यास येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व कार्यालयांना सदर परिपत्रक ई मेलव्दारे त्वरीत पाठविण्यात येवुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.